जा.क्र./नसका/स्थायी/CR-75/2014.
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक :- 21.08.2014

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.</u>**

**<u>स्थायी समितीच्या सभेची सूचना</u>**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम** 1949 **चे अनुसूची ड चे प्रकरण** -2 **मधील नियम क्र.**3 **(अ) अन्वये**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र 3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दि.25.08.2014. रोजी दु.12.00 वा.** नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.
(मा.सभापती यांचे आदेशान्वये)

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति,
**श्री/श्रीमती** ______________________
सदस्य / सदस्या स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

## <u>कार्यक्रम पत्रिका</u>

**विषय क्र.1**

नांवाशमनपा आदेश क्र.8678, दि.04.08.2014 अन्वये मेस्को सेक्युरिटी सर्व्हीसेस, पुणे यांनी पुरवठा केलेले (06) सुरक्षारक्षकांच्या सेवेस माहे 21.02.2014 ते 20.02.2015 या एका वर्षासाठी पूर्वीच्याच अटी व शर्तीच्या अधिन राहून मूदतवाढ देण्यात आली याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्र.2**

नांवाशमनपा आदेश क्र.आवि/औभां/9381, दि.14.08.2014, अन्वये श्रीमती कस्तुरबा मातृसेवा केंद्र, शिवाजीनगर म.न.पा. दवाखाना नांदेड येथे कुटूंब कल्याण शस्त्रकिया हा कार्यक्रम राबविण्यासाठी मे.ओम मार्केटिंग एजेन्सी, नांदेड यांचेकडून निविदा दर करारावर रू.2,30,673/- ची औषधी व सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात आले याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्र.3**

नांवाशमनपा आदेश क्र.आवि/नाहियो/औभां/9026, दि.08.08.2014, अन्वये मनपा हद्दीत नागरी हिवताप योजनेअंतर्गत धुरीकरण हा कार्यक्रम राबविण्यासाठी मे. जान्हवी पेस्ट कंट्रोल डोंबिवली (इस्ट) ठाणे या निविदा धारकाकडून रु. 5,26,500/- ची फॉगींग मशीन खरेदी करण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्र.4**

नांदेड शहर गोदावरी नदीकाठी वसलेले आहे, अनेक जाती-धर्माचे श्रध्दास्थान म्हणुन गोदावरील नदीला मानले जाते. सदर नदीकाठी पवित्र स्नान व दर्शणासाठी भावी भक्तांची गर्दी असते त्यावर पावसाळयात एक खबरदारीचा उपाय म्हणुन

विविध घाटावर जिवरक्षक तैनात केले जातात. तसेच गणेश विसर्जन, दुर्गा विसर्जन, तख्तस्थान, मोहरम इ. सारख्या सणा सुदीच्यावेळी काही अनुचीत प्रकार घडु नये म्हणुन जिवरक्षक लावण्यात येतात. मागील अनेक वर्षापासुन या जिवरक्षकांना प्रति जिवरक्षक प्रति दिवस 200/- रु. व प्रति तराफा 2500/- रु. ऐवढे मानधन देण्यात येते.

जिवरक्षक असणा-या संस्था मानधन वाढी बाबत वारंवार मागणी करत होत्या. त्या अनुषंगाने दि.04.09.2013 रोजी. दै. वर्तमान पत्रात (दै. समिक्षा) जाहीर प्रगटन देऊन विविध जिवरक्षक असणा-या संस्था मार्फत प्रति जिवरक्षक व प्रति तराफा मानधनाचे दर मागवण्यात आले. दरपत्रकावर चर्चा व वाटाघाटीसाठी विविध संस्थांना दि.27.05.2014 रोजी मा. उप आयुक्त यांच्या कक्षात बोलावण्यात आले. वाटाघाटी अंती प्रतिजिवरक्षक प्रतिदिवस मानधन 200 ऐवजी 250/- रु. ठरवण्यात आले व प्रतितराफा मानधनात कोणताही बदल न करता पुर्वी प्रमाणेच 2500/- रु. देण्याचे ठरवण्यात आले.

**विषय क्र.5**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, हद्दित 2013-14 या आर्थिक वर्षासाठी झोन क्र. 1,2,3,4,5 व 6 मधील वार्षीक देखभाल व दुरुस्तीची कामे करण्या करिता निविदा मागविण्यात आले असता झोन क्रं. ३ साठी कंत्राटदार श्री. डी. एम. पाटील नांदेड, यांची सर्वात कमी दराची म्हणजे 17.50% जास्त दराची निविदा प्राप्त झाली निविदेतील दर जास्त वाटत असल्यामुळे संबंधितांशी वाटाघाटी केली असता वाटाघाटी अंती अंदाजपत्रक दरापेक्षा 4% जास्त दराने काम करण्यास लेखी संमती दिली त्यानुसार स्थायी समिती ठराव क्रं. 70 दि.11.07.2013 अन्वये निविदा मंजुर करण्यात आली. कंत्राटदार श्री. डी. एम. पाटील नांदेड, यांनी दि. 04.07.2014 रोजी अर्ज देऊन साल सन 2014-15 मध्ये झोन क्रं. 3 ची वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे त्यांना देण्यासाठी विनंती केली आहे. झोन क्रं. 3 ची वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे सालसन 2013-14 च्या मंजुर दरावर कंत्राटदार श्री. डी. एम. पाटील नांदेड, यांना दिल्यास महापालिकेचा आर्थिक फायदा होईल. करिता साल सन 2013-14 चे AMRC चे कंत्राटदार डी. एम. पाटील नांदेड, यांचेकडुन 2013-14 चे मंजुर दरावर पुढील आर्थिक वर्ष साल-सन 2014-15 मध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करुन घेणेसाठी (मुदतवाढ देणे बाबत) मान्यतेस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रु. **50.00** लक्ष यास प्रशासकीय व अर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.6**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दित प्रभाग क्र. 25 मधील ईदगाह कमान येथे मा. महापौर यांचे मौखीक आदेशान्वये मा. आयुक्त यांचे मान्यतेने इदगाह कमान येथे पानपोईचे बांधकाम करण्यासाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदर पानपोईत कुलींग मशीन बसविण्यात आली. व नळ फिटींग, लाईट फिटींग, पाण्याची टाकी, स्ट्रक्चर व पांढरा मारबल व सि.सि. वोटा यांचे बांधकाम करुन घेण्यात आले असून सदरचे काम तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्यामुळे आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुचि 2013-14 नुसार रु. 4,72,980/- चे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. कामाची निकड, व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर मे. माज कंन्स्ट्रक्शन नांदेड या कंत्राटदाराकडून पुर्ण करुन घेण्यात आले असुन त्यास झालेला खर्च रु. 4,72,980/- यास कार्योत्तर प्रशासकीय व अर्थिक मंजुरीसाठी प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 कलम 2 नुसार स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.7**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पाणीपुरवठा योजने अंतर्गत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नागरी दलीत्तेतर वस्त्यांमध्ये सुधारणा करणेच्या योजने अंतर्गत शक्तीनगर जलकुंभावरील वितरण व्यवस्था स्वतंत्र करणे करिता मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र. 155 दि. 25.01.2013 अन्वये मान्यता घेवुन सविस्तर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या कडे पाठविला असता जिल्हाधिकारी कार्यालय यांचे कडुन दि. 17.01.2013 अन्वये 50% अनुदान सदरील योजनेतुन रु. 31,34,500/- प्राप्त झाले असुन व महापालिका हिस्सा 50% रु. 31,34,500/- असे एकुण रु. 62,69,120/- रुपयास प्र./आ.मान्यता प्राप्त झाली असुन त्यानुसार निविदा (दुस-यांदा) मागविले असता सदर कामासाठी दोन निविदा प्राप्त झाले असुन सर्वात कमी दराची निविदा मे. इंद्रजा कंन्स्ट्रक्शन यांचे असुन ती अंदाज पत्रक दरापेक्षा 9% जास्त दराने प्राप्त झाली आहे. प्राप्त दर हे जास्त वाटत असल्याने ठेकेदारास वाटाघाटीसाठी उपआयुक्त (विकास) यांचे कक्षात बोलवीले असता

आज दि. 28.05.2014 रोजी ठेकेदारांनी 9% जास्त दरा ऐवजी अंदाज पत्रक दरापेक्षा 4.10% जास्त दराने काम करण्यास लेखी संमती दिली आहे.

त्या अनुषंगाने अंदाज पत्रक दरापेक्षा 4.10% जास्त दराची निविदा मान्य करणेसाठी प्रस्ताव स्थायीसमिती समोर मंजुरीस्तव सादर. तसेच सदर योजनेत 50% शासन अनुदान 50% मनपा सहभाग रु. 31,34,500/- व जास्तीचा लागणारा खर्च रु. 4.10% जास्त मनापा निधितुन खर्च करण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यते करिता सादर.

**विषय क्र.8**

नांदेड शहर पाणी पुरवठयाचा मुख्य स्त्रोत असलेल्या विष्णुपूरी प्रकल्प जलाशयात अत्यंत अल्प जलसाठा शिल्लक आहे. दि. 19.08.2014 रोजी 8.83 दलघमी इतकाच पाणी साठा शिल्लक आहे. अद्याप पाऊस झालेला नसल्यामुळे विष्णुपूरी जलाशयातील उपलब्ध जलसाठा जास्त काळासाठी पूरवावा लागणार आहे. सध्या नांदेड शहरात दोन दिवसआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे. या प्रमाणात पाणी पुरवठा झाल्यास उपलब्ध जलसाठा फक्त 35 दिवस पुरेल ऐवढाच आहे. सध्याच्या परिस्थितीचा विचार करुन उपलब्ध जलसाठा जास्त काळ टिकविणेसाठी नांदेड शहरास आठवडयातून एक दिवस पाणी पुरवठा करणे आवश्यक असून यासाठी तातडीने मान्यता देण्यासाठी सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**विषय क्र.9** <u>विनंती अर्ज</u>

**दिनांक : 19/08/2014**

**प्रति**,
**मा. सभापती साहेब**,
स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**विषय :-** <u>पारगमन शुल्क वसुली नाके बंद झाल्याने आर्थिक नुकसान झाल्या बद्दल.</u>
**संदर्भ :-** पारगमन शुल्क वसुली नाके बंद करण्याच्या आदेशाच्या संदर्भात दि. 15.08.2014 जा.क्र. 204/14 नुसार

**महोदय**,

वरील विषयी आपल्या सेवेत सादर करण्यात येते की, नां.वा.श.म.न.पा. नांदेड कार्यालया मार्फत पारगमन शुल्क नाके बंद करणे बाबत वरील संदर्भीय आदेश दिनांक 15.08.2014 चे आम्हाला दिनांक 15.08.2014 सुटीच्या दिवशी संध्याकाळी 6.00 वाजता मिळाले आणि तात्काळ रात्री 12.00 वाजता नाके बंद करण्याचे आदेशीत करण्यात आलेले होते व त्यासंदर्भात सर्व पावती पुस्तके अभिलेख जमा करण्याचे आदेश देण्यात आलेले होते.

वरील विषयीवर असे आहे की आम्ही हे मुक्ता एका वर्षासाठी घेतला होता आपले जाहिराती प्रमाणे आम्ही हा टेंडरची रक्कम टेंडरात भरली होती व वाटाघाटमध्ये जे रक्कम आपलेले वाढवुन दिलेली होती तो आमचा हिशोब एका वर्षाची वसुलीवर आधारीत होता. त्याचा कारण एकावर्षात मे, जुन, जुलै, ऑगष्ट पावसाळेचे असल्यामूळे मालवाहतुकाचा प्रमाण कमी होऊन जाते व ऑगष्ट आखेर महिन्यापासुन सन आणि लग्नसरा चालु होतात त्यासाठी मालवाहतुकीचा प्रमाण वाढुन जाते. आम्ही हे टेंडर 03 मे 2014 पासुन सुरु केला आहे आपले आदेश प्रमाणे दि. 15.08.2014 रोजी रात्री 12.00 वाजता नाके बंद केले.

आम्ही हे नाके 365 दिवसा पैकी 105 दिवस चालविले आहे. व जे 105 दिवस आम्ही चालवलेले आहे. ते दिवस पावसाळाचे होते. त्यात दिवसात वसुलीचा प्रमाण कमी झालेला आहे. आम्ही हे नाके चालविण्यासाठी आपल्याला रु.63 लाख रुपयाची बँक गॅरंटी तयार करुन दिलेली आहे. हया बँक गॅरंटी तयार करण्यासाठी आम्हाला 4,50,000/- रुपये कमीशन आणि चार्जेस लागलेला आहे तसेच आपल्या कडुन जे नाके दिलेले आहेत त्याची दुरुस्ती, लाईट दुरुस्ती, नाक्यावर जनरेटर, रस्तेचे खड्डे यासाठी नागपुर नाक्यावर रु. 95,000/- , हैद्राबाद नाक्यावर रु.75,000/- आणि लातूर नाक्यावर रु. 50,000/- व कर्मचाऱ्यावर एप्रिल-2014 मध्ये रु.6,50,000/-, मे-2014 रु.6,70,000/-, जुन-2014 रु.6,25,000/-, जुलै-2014 रु.6,65,000/-, ऑगष्ट-2014 रु. 6,75,000/- व कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी जे तीन घर 11 महिन्या करिता किरायाने घेतले होते त्यावर येणाऱ्या खर्चा रु. 2,16,000/- रु. 54,000/-, रु. 54,000/- व दोन वाहन (मारोती वेन ) जे

पेट्रोलींगसाठी होती त्याचा किरायाला रु. 1,50,000/- व त्याचा डिझेल खर्च  रु. 95,000/- महानगरपालिका आणि आमच्या जे करार झाला होता त्या कराराला रजिष्ट्रर करण्यासाठी रु. 95,000/- आम्हाला सरकारी फी भरावाला लागला होता. व दि. 03.05.2014 पासुन 15.08.2014 पर्यंत एकुण 105 दिवसात एकूण वसुली रु. 16599100/- झालेली आहे.  ज्याचा पुर्ण अहवाल आम्ही आपल्याकडे सादर केलेला आहे.  जे हिशोबाने आम्ही हे टेंडर घेतलेले आहे त्या हिशोबाने  105 दिवसात आम्हाला 18123315/- इतकी पैसे महानगरपालिकेला द्यावा लागला यात आम्हाला रु. 1524215/- फक्त भरण्यात नुकसान झालेला आहे. असे मिळुन एकुण 61,43,215/- नुकसान झालेला आहे.व आम्हाला आपल्याला रु. 23,73,315/- द्याचे आहे. तरी आपणास विनंती आहे की झालेले नुकसान ची भरपाई करण्यात यावी.  ही विनंती.

धन्यवाद !

**स्वाक्षरीत/-**
मयुर इंटरप्राजेस

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.